महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id :mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/माप्रवि/४६२३
दिनांक : ०४/१०/२०२०

# आदेश

विषय:- पुणे महानगरपालिका क्षेत्रामधील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील Outside Containment Zone) हॉटेल्स, फुडकोर्ट, रेस्टॉरंट व बार इ. सुरु ठेवणे बाबत.

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1/दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२० ,

५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०

६) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३३, दि.०१.०८.२०२०

७) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३४, दि.०३.०८.२०२०

८) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९६४, दि.०४.०८.२०२०

९) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३३६१, दि.१७.०८.२०२०

१०) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३७९१, दि.०२.०९.२०२०

११) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४६१५, दि.०१.१०.२०२०

उपरोक्त राज्य शासनाच्या संदर्भ क्र४ चे आदेशाच्या अनुषंगाने संदर्भ क्र११ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका,** पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये हॉटेल्स, फूड कोर्ट, रेस्टॉरंट व बार सुरु ठेवणेबाबत खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पुणे महापालिका क्षेत्रामधील प्रतिबंधित क्षेत्रा बाहेरील **(Outside Containment Zone)** हॉटेल्स, फूड कोर्ट, रेस्टॉरंट व बार हे दिनांक ०५/१०/२०२० पासून ५०% क्षमतेनुसार सुरु राहतील. याकरिता पर्यटन विभागाकडून निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना (SOP) चे पालन करणे बंधनकारक आहे.

२) **पुणे महापालिका क्षेत्रामधील प्रतिबंधित क्षेत्रा बाहेरील हॉटेल्स, फूड कोर्ट, रेस्टॉरंट व बार खालील अटी व शर्तींच्या आधारे सुरु राहतील.**

- पुणे महापालिका क्षेत्रामधील प्रतिबंधित क्षेत्रा बाहेरील **Outside Containment Zone)** हॉटेल्स, फूड कोर्ट, रेस्टॉरंट व बार हे दिनांक ०५/१०/२०२० पासून ५०% क्षमतेनुसार सुरु राहतील.
- **सदर आस्थापना या सकाळी ०८:०० ते रात्री १०: ०० वाजेपर्यंत सुरु राहतील.**
- हॉटेलमध्ये येणाऱ्या सर्व ग्राहकांची प्रवेशद्वाराजवळ थर्मल स्क्रीनींग (Thermal Gun) द्वारे तपासणी करण्यात यावी.
- कोविड -१९ संदर्भात लक्षणे नसलेल्या ग्राहकांनाच हॉटेलमध्ये प्रवेश देण्यात यावा.ताप, सर्दी खोकला या सारखी लक्षणे असलेल्या ग्राहकांना हॉटेल मध्ये प्रवेश देवू नये. कॉन्टॅक्ट ट्रेसिंगच्या अनुषंगाने प्रत्येक ग्राहक/ग्रुप मधिल एकाचे नाव,संपर्क क्र,इ-मेल आयडी, दिनांक,वेळ इ. माहितीच्या नोंदी दररोज ठेवण्यात याव्यात.
- कॉन्टॅक्ट ट्रेसिंगच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार ग्राहकांची माहिती आरोग्य विभाग किंवा प्रशासनास देण्याबाबत त्यांची ना हरकत घेण्यात यावी.
- सदर आस्थापनांनी सेवा देताना किंवा प्रतीक्षालय (Waiting Area) येथे सोशल डीस्टन्सींग Social Distancing) चे नियमांचे पालन करावे.
- ग्राहकांनी मास्क परिधान केले असेल तरच त्यांना हॉटेलमध्ये प्रवेश देण्यात यावा. ग्राहकांनी हॉटेलमध्ये व हॉटेलच्या परिसरात असताना मास्क परिधान करणे बंधनकारक आहे (खानपाना व्यतिरिक्त).

- संबंधित आस्थापना चालकांनी ग्राहकांसाठी हॅन्ड सॅनिटाईजर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. हॅन्ड सॅनिटाईजर ग्राहकांच्या वापराकरिता प्रतीक्षा कक्ष, प्रवेशद्वार इ. ठिकाणी ठेवण्यात यावे.
- आस्थापना चालकांनी ग्राहकांना शक्यतो डीजीटल माध्यमाद्वारे पेमेंट करण्यास प्रोत्साहन द्यावे.रोख स्वरुपात पेमेंट घेताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी. कॅशिअर यांनी त्यांचे हात सतत निर्जंतुक करावेत.
- रेस्टरूम आणि हात धुण्याच्या जागा (Wash Room) यांची वारंवार स्वच्छता करण्यात यावी व त्या जागा सॅनिटाईज कराव्यात.
- काऊंटर कॅशिअर आणि ग्राहकांमध्ये शक्यतो प्लेक्सिग्लास स्क्रीन या सारखे बॅरीयर असावे. शक्य असल्यास प्रवेशासाठी व बाहेर जाण्यासाठी वेगवेगळे मार्ग ठेवावेत.
- शक्य असल्यास दारे,खिडक्या उघडी ठेवावीत व ए.सी.चा वापर टाळावा.ए.सी. वापरणे अनिवार्य असल्यास त्या यंत्रणेचे वेळोवेळी निर्जतुकिकरण करण्यात यावे. शक्य असल्यास पोर्टेबल हाय एफिशियंसी एयर क्लीनर बसवावेत.
- सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत असावी. सी.सी.टीव्ही रेकॉर्ड जतन करण्यात यावे.
- व्हॅलेट पार्किंग उपलब्ध असल्यास त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचा-यांनी मास्क,ग्लोव्हज यांचा वापर करणे अनिवार्य आहे.
- डिस्पोजेबल मेनू कार्ड,क्यूआर कोडसारख्या माध्यमातून संपर्करहित मेनुकार्ड उपलब्ध करण्यात यावे.रीयुजेबल मेनू कार्ड ग्राहकांचे वापरानंतर निर्जंतुक करावे. डिस्पोजेबल मेनू कार्ड वापरानंतर त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी.
- कापडाच्या नॅपकिन ऐवजी चांगल्या प्रतीच्या डिस्पोजेबल पेपर नॅपकिनचा वापर करावा
- सदर आस्थापनांनी दोन टेबल मधिल अंतर कमीत कमी १मीटर असेल या प्रमाणे त्यांचे रचने मध्ये योग्यते बदल करून घ्यावेत.
- ग्राहकांच्या मागणी नुसार बाह्य बाजू निर्जंतुक केलेली सीलबंद बाटलीतील पाणी अथवा फिल्टर केलेले पाणी ग्राहकांना उपलब्ध करून द्यावे.
- मेनू मध्ये फक्त शिजविलेल्या खाद्य पदार्थांचा समावेश करावा शक्य असल्यास सलाड सारखे कच्चे पदार्थ, थंड पदार्थ टाळावेत.
- प्रत्येक ग्राहकांच्या वापरानंतर ग्राहक सर्विस एरियाचे निर्जंतुकीकरण करण्यात यावे. फर्निचर,टेबल,खुर्च्या, बुफे टेबल,काऊन्टर इ.जागांचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- बुफे सेवेला परवानगी नाही.
- शक्य असेल तेथे मेनू मध्ये प्री प्लेटेड डिशेसना प्रोत्साहन द्यावे.

- केवळ नेमून दिलेले कर्मचारी यांनीच संबंधित टेबल वर अन्न पदार्थ सर्व्ह करावे.
- प्लेट्स,चमचे आदी सर्व सेवा उपकरणे गरम पाण्यात व मान्यता प्राप्त जंतूनाशकाने धुवावीत.
- सेवा उपकरणे,वस्तू,भांडी ही वेगवेगळी आणि सॅनिटाईज केलेल्या कपाटात ठेवावीत.
- शक्य असल्यास सेवा उपकरणे व अन्न पदार्थ गरम ठेवण्यासाठी वेगवेगळे वाम्‌र्स असावेत.
- ग्राहकांनी वापरलेली प्लेट्स,चमचे,ग्लास इ. सेवा उपकरणे तातडीने धुण्यासाठी धुण्याच्या जागी न्यावीत. शिल्लक राहिलेले अन्न हे संबंधित बकेट मध्ये जमा करावे तसेच दररोज जमा होणार्या कचऱ्याची दररोज विल्हेवाट लावावी.
- "ग्राहकांनी हॅन्ड सॅनिटाईजरचा वापर करावा, जेवणा व्यतिरिक्त मास्कचा वापर करावा" अशा प्रकारचे पोस्टर्स आस्थापनांचे प्रवेश द्वाराजवळ लावावेत.
- ऑनलाईन आउटलेट असणाऱ्या आस्थापनांनी आस्थापना सुरु असण्याच्या वेळा,मास्कचा वापर,खाद्यपदार्थची आगाऊ बुकिंग,आगाऊ पेमेंट,डिलिवरी इ.बाबत असणारे नियम/ पॉलिसी यांची माहिती वेबसाईट, सोशल मिडिया इ. माध्यमातून प्रसिद्ध करावी.
- करमणुकीचे लाईव्ह कार्यक्रम,वेंडिंग व इतर गेम एरिया (including Billiards, darts & Video Games) इनडोर व आउटडोर कार्ड रूम्स यांना परवानगी नाही.
- सर्व संबंधित आस्थापनानी त्यांच्या सर्व कर्मचा-यांची नियमित कोविड-१९ चाचणी करावी. एन-९५ किंवा त्याच दर्जाचा मास्क कर्मचा-यांनी वापरणे अनिवार्य आहे. आस्थापनावरील कर्मचा-यांनी त्यांचा गणवेश दररोज बदलणे अनिवार्य आहे. गणवेश व्यवस्तीत सॅनिटाईज करावा. दिवसातून २ वेळा परिसराचे निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- सदर आस्थापनांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांचे कामाच्या ठिकाणी आल्यावर थर्मल स्कीनिंग करावे. सर्व कर्मचा-यांनी त्यांच्या आरोग्याची स्वत: काळजी घ्यावी तसेच कोविड-१९ संदर्भात काही लक्षणे दिसून आल्यास तात्काळ कोविड-१९ हेल्पलाईन वर वैद्यकीय उपचाराकरिता संपर्क साधावा.
- ग्राहकांनी गर्दी टाळण्यासाठी शक्यतो जागेचे पूर्व आरक्षण करावे. ग्राहकांनी प्रतीक्षालया मध्ये सोशल डीस्टन्सिंगच्या नियमांचे पालन करावे.
- सदर आस्थापनांनी सामाजिक अंतर पाळण्याच्या दृष्टीने आवश्यक तेथे फरशीवर मार्किंग करून घ्याव्यात.
- गर्दी टाळणेसाठी हॉटेल्स, फूड कोर्ट, रेस्टॉरंट व बार यांच्या क्षमतेनुसार ग्राहकांना प्रवेश द्यावा.
- सदर आस्थापना चालकांनी त्यांच्या कर्मचा-यांना कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी घ्यावयाच्या दक्षता,सोशल डीस्टनसिंग पाळणे, वैयक्तिक स्वच्छता, खाद्यपदार्थ तयार करताना घ्यावयाची दक्षता, स्वच्छता व निर्जंतुकीकरण इ.बाबत प्रशिक्षण द्यावे.

- किचन एरिया वारंवार सॅनिटाईज करण्यात यावा.
- सदर आस्थापनांच्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी यांनी मास्क, ग्लोव्हज, शेफकॅप/ नेटकॅप,फेसशिल्ड अशा सुरक्षा साधनांचा वापर करणे अनिवार्य आहे.
- सदर आस्थापनांनी HAACP/ISO/FSSAI यांचे स्वच्छता ( Sanitization & Hygiene) बाबतचे निकष व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पणे पालन करावे.
- सदर आस्थापनांनी त्याचेकडे जमा होणारा ओला, सुका, बायोडीग्रेडेबल इ. कच-याचे योग्य व्यवस्थापन करावे. ग्लोव्हज,मास्क इ.चे स्वतंत्रपणे व्यवस्थापन करावे.

३) हॉटेल्स, फूड कोर्ट, रेस्टॉरंट व बार सुरु ठेवताना कोविड-१९ प्रतिबंध उपाय योजना करण्याकरिता पर्यटन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शन सूचनांचे काटेकोर पणे पालन करण्यात यावे.

४) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील

५) कोविड -१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन करणारा व्यक्ती, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ अन्वये दंडनिय अपराध केला असे समजून कारवाईस पात्र राहील.

६) सदर आदेश दि. ०५/१०/२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक ०४/१०/२०२० रोज दिलेला आहे.

स्वाक्षरी/XXX
(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका,पुणे.

स्थळ प्रतीवर मा.आयुक्त
यांची स्वाक्षरी असे

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

(सुनिल इंदलकर)
उप आयुक्त (मा.प्र.)
पुणे महानगरपालिका,पुणे.